पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ८

**सभावृत्तांत**

दिनांक - **११/०८/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **११/०८/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते - सभापती**
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ - उपसभापती
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.फुगे भिमाबाई पोपट
५. मा.डब्बू आसवानी (हिरानंद)
६. मा.अड.भोसले सचिन सुरेश

या शिवाय मा.कडूसकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.कदम – प्रशासन अधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.५) जिल्हास्तरीय महापौर चषक कराटे स्पर्धा घेणेबाबत – मा.अंबरनाथ कांबळे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) भोसरी येथील सहल केंद्रामधील तलावाजवळ मनपा व्यायामशाळा चालविण्यास मिळणेबाबत – मा.अंबरनाथ कांबळे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) प्र.क्र.८ मध्ये संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी येथील लॉन टेनिस कोर्ट भाडेतत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.अंबरनाथ कांबळे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) से.२६ निगडी-आकुर्डी, प्राधिकरण लॉन टेनिस कोर्ट भाडेतत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) ताईक्वांडो खेळामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर निवड झाल्याने मनपा क्रीडा धोरणा अंतर्गत आर्थिक सहाय्य देणेबाबत – मा.अंबरनाथ कांबळे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) पिंपरी चिंचवड फेस्टिवल आयोजनाबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **१४/०७/२०१७ व २८/०७/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.७)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक – ३४ विषय क्रमांक - ०१
दिनांक - ११/०८/२०१७ विभाग - क्रीडा
सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा.बाळासाहेब ओव्हाळ
संदर्भ : मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/६९३/२०१७, दि.३०/०६/२०१७

विषय - महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१७-१८ आयोजित करणेस व येणा-या खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणेबाबत.

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३५ विषय क्रमांक - ०२
दिनांक - ११/०८/२०१७ विभाग - क्रीडा
सुचक : मा.भिमाबाई फुगे अनुमोदक : मा.सचिन भोसले
संदर्भ : मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/१८८/२०१७, दि.२७/०७/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.महापालिका सभा ठराव क्र.१२०६ दि.२०/१०/२०११ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/१८८/२०१२ दि. ०४/०७/२०१२ अन्वये, म.न.पा. परिसरातील विद्यार्थी खेळाडू करिता खेळाडू दत्तक योजना राबविणे बाबतच्या धोरणास मान्यता दिली असून, सदर खेळाडू दत्तक योजना दि.०४/०७/२०१२ पासून राबविणे बाबत अंमलबजावणी करणेस मान्यता दिलेली आहे. खेळाडू दत्तक योजना २०१६-१७ (पाचवी बॅच) अनुषंगाने वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्दी देऊन दि.२५/०८/२०१६ ते २०/०९/२०१६ या कालावधीत अर्ज मागविले असता एकूण ८९ खेळाडूंचे अर्ज प्राप्त झाले आहेत. त्या अर्जांवर क्रीडा अधिकारी, खेळाडू दत्तक योजना प्रमुख व संबंधित खेळाचे क्रीडा पर्यवेक्षक यांनी प्रस्तावात नमुद प्रमाणे एकूण ८९ अर्जांपैकी ४७ खेळाडूंचे अर्ज पात्र करून खेळाडू दत्तक योजना २०१६-१७ चा लाभ २ वर्षाकरीता देणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे येणा-या खर्चास र.रु.१,०२,५९,२००/- **(** अक्षरी र.रु.एक कोटी, दोन लाख, एकोणसाठ हजार दोनशे फक्त**)** चे खर्चास व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखा शिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३६ विषय क्रमांक - ०३
दिनांक - ११/०८/२०१७ विभाग - क्रीडा
सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.सचिन भोसले
संदर्भ : मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/१८९/२०१७, दि.२७/०७/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.महापालिका सभा ठराव क्र.१२०६ दि.२०/१०/२०११ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/१८८/२०१२, दि.०४/०७/२०१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे, क्रीडा धोरण व सदर आदेशातील अट क्र.१० मध्ये खेळाडू दत्तक योजने अंतर्गत निवड झालेल्या खेळाडूने सलग २ किंवा १ वर्षात राज्य, राष्ट्रीय व आंतरविद्यापीठ स्तरावर प्राविण्य न मिळविल्यास अशा खेळाडूंना तेथून पुढे या योजनेचा लाभ दिला जाणार नाही. असे नमुद आहे. त्यानुसार खेळाडू दत्तक योजना २०१५-१६ व २०१६-१७ चे लाभार्थी ३१ खेळाडूंच्या प्राविण्या बाबत संबंधीत क्रीडा पर्यवेक्षक व क्रीडा अधिकारी यांनी तपासणी केली असता ३१ पैकी २१ खेळाडूंनी अर्ज सादर केले आहेत त्यापैकी १२ खेळाडू पात्र असा अहवाल क्रीडा विभागास दिलेला आहे. प्रस्तावात नमुद १२ पात्र खेळाडूंना खेळाडू दत्तक योजना २०१७ – १८ चा लाभ १ वर्षाकरीता देणेस व

त्याकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे येणा-या र.रू.२३,०१,६००/- ( अक्षरी र.रु.तेवीस लाख, एक हजार, सहाशे फक्त ) चे खर्चास व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ११/०८/२०१७ विभाग – सार्वजनिक वाचनालय

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ : मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.सावा/२/कावि/७२२/२०१७, दि.०३/०८/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वजनिक वाचनालय विभागामार्फत चालविण्यात येणा-या सार्वजनिक वाचनालयांकरीता मे.हिंदुस्थान प्रकाशन संस्था यांचेकडुन साप्ताहिक विवेक साप्ताहिकांची पाच वर्षासाठी थेट पध्दतीने खरेदी करणेस तसेच त्यासाठी येणारा खर्च र.रु.२०,८००/- ( अक्षरी र.रु. वीस हजार आठशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेकामी मा. स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ३८ विषय क्रमांक - ०५

दिनांक - ११/०८/२०१७

सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.अंबरनाथ कांबळे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जिल्हास्तरीय महापौर चषक कराटे स्पर्धा, प्रभाग क्र.१८ मध्ये मोरया गोसावी क्रीडांगण चिंचवडगाव या ठिकाणी घेण्यात याव्यात. सदर स्पर्धेचे आयोजन-नियोजन करणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा. स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३९ विषय क्रमांक - ०६

दिनांक - ११/०८/२०१७

सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.अंबरनाथ कांबळे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भोसरी येथील सहल केंद्रामधील तलावाजवळ मनपा व्यायामशाळा आहे. ही व्यायामशाळा Apple Fitness Club भोसरी यांना ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.र.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावार चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४० विषय क्रमांक - ०७

दिनांक - ११/०८/२०१७

सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.अंबरनाथ कांबळे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा विभागामार्फत संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी लॉन टेनिस कोर्ट, शिवसाम्राज्य प्रतिष्ठान, भोसरी या संस्थेस ५ वर्षाच्या भाडेतत्वावर मनपाच्या अटी व शर्तीनुसार चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१ विषय क्रमांक - ०८

दिनांक - ११/०८/२०१७

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.सचिन भोसले

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव –

सेक्टर २५, निगडी-आकुर्डी प्राधिकरण लॉन टेनिस कोर्ट भाडेतत्वावर मनपा नियमानुसार पाच वर्षे कालावधीकरिता एकविरा सेवा संघ, चिंचवड या संस्थेस देण्यात यावा. एकविरा सेवा संघ, चिंचवड या संस्थेचा रजिस्टर नंबर महा १८५७/२०१२ हा आहे. मनपा नियमानुसार सदरची संस्था भाडे देण्यास तयार आहे. एकविरा सेवा संघ, चिंचवड या संस्थेचे काम अतिशय चांगल्या पध्दतीचे आहे. तरी सदरचे लॉन टेनिस कोर्ट एकविरा सेवा संघ, चिंचवड या संस्थेस भाडेतत्वावर देणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२ विषय क्रमांक - ०९

दिनांक - ११/०८/२०१७

सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.अंबरनाथ कांबळे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव –

कु.नम्रता सुनिल तायडे, रा.संभाजीनगर, इ.९ वी, सुबोध माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थीनीची ताईक्वांडो या खेळामध्ये ५९ वजनी गटामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर ३ री जागतिक ताईक्वांडो कॅडेट चॅम्पियनशिप २०१७-१८ शार्म इल शेख, इजिप्त येथे दि.२४ ते २७ ऑगष्ट दरम्यान होणार आहे. या स्पर्धेत कु.नम्रता सुनिल तायडे हिची निवड झालेली आहे. या अनुषंगाने कु.नम्रता सुनिल तायडे हिस मनपाच्या क्रीडा धोरणानुसार र.रु.१,००,०००/- चे अर्थ सहाय्य देणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४३ विषय क्रमांक - १०

दिनांक - ११/०८/२०१७

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.सचिन भोसले

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव –

मा.स्थायी समिती मध्ये दिनांक १०/०८/२०१७ रोजी झालेल्या चर्चेनुसार माहे ऑगष्ट व सप्टेंबर २०१७ मध्ये पिंपरी चिंचवड फेस्टिवलचे आयोजन सांस्कृतिक व कला धोरणा अंतर्गत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **लक्ष्मणशेठ सोपान सस्ते** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१०५७/२०१७
दिनांक : ११/०८/२०१७

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 17 sub committee sabhapati.doc